32.1

ISSN 2277-8063 (Print)
June- 2023
Vol. XII / Issue. II / 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

IIJIF IIJS Cosmos

Chief Editor
Prof. Dr. Ravindra P. Bhanage
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
HOUSA Publication

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 44. | History | JRD Tata a Visionary Nation Builder | Waghmare Kabirdas Sudam | 170-174 |
| 45. | इतिहास | महाराष्ट्रातील चळवळीच्या इतिहास अनूषंगाने हैद्राबाद मूक्तीसंग्रमात मराठवाड्याचे योगदान | शिवाजी काशीनाथ गायकवाड | 175-177 |
| 46. | राज्यशास्त्र | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रामधील सामाजिक चळवळीचे नेतृत्व: एक अभ्यास | संजय बाळगोंडा खोत | 178-181 |
| 47. | राज्यशास्त्र | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ आणि शेतकरी संघटनेतील गटबाजीचे राजकारण | प्रा. डॉ. संजय सागरु सपकाळ | 182-185 |
| 48. | इतिहास | श्री बापू तुकाराम गुरव : एक अपरिचित स्वातंत्र्यसैनिक | श्री. संदीप बळवंत गुरव | 186-189 |
| 49. | इतिहास | वसतिगृह चळवळीपाठीमागील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका | श्री.संदिप वसंतराव जाधव | 190-194 |
| 50. | इतिहास | पर्यावरण चळवळीचे भारतीय आयाम व महात्मा गांधीजींच्या पर्यावरण विषयक विचारांची उपयुक्तता | समाधान आबा जाधव | 195-199 |
| 51. | इतिहास | तात्यासाहेब कोरे यांचे वारणा खोऱ्यातील सहकार चळवळीला लाभलेले योगदान | सौरभ राजेश झेंडे | 200-203 |
| 52. | इतिहास | समाज सुधारणेत सावित्रीबाई फुले यांचे योगदान | डॉ.हणमंत बाळकृष्ण नागणे | 204-206 |
| 53. | History | Role of Naval Central Strike Committee during RIN Mutiny 1946 | Mr. Somanath Satapute | 207-212 |
| 54. | History | Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar and Challeges in The Implementation of Fundamental Rights | Harshal Shashikant Shinge | 213-219 |
| 55. | Economics | Economic Ideas of Mahatma Gandhi in Relevance of Globalization | Dr. Dnyanraja Chighalikar | 220-222 |
| 56. | राज्यशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे राजकीय क्षेत्रावर झालेला परिणाम | शरद विठ्ठल पाटील | 223-225 |
| 57. | राज्यशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे अनुसूचित जातीच्या चळवळीवरील राजकीय परिणाम | उषादेवी अंकुश कांबळे | 226-228 |
| 58. | राज्यशास्त्र | 1991 च्या नवीन आर्थिक धोरणाचे भारतातील निवडक राष्ट्रीय राजकीय पक्षाच्या धोरणावरील परिणाम | श्री राजेंद्र शरद जायकर<br>डॉ. टी. एम. पाटील | 229-234 |
| 59. | इतिहास | जागतिकीकरण व पर्यटन : एक चिकित्सा | डॉ. सुरेश मारुती चव्हाण<br>प्रा. प्रशांत प्रकाश कांबळे | 235-237 |
| 60. | Library & Inf science | जागतिकीकरणात महाविद्यालयीन ग्रंथपालाची बदलती भूमिका | समीर श्रीहरी कुलकर्णी | 238-241 |
| 61. | वाणिज्य | महात्मा गांधी : शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय विचार | प्रा. सचिन सोमगोंडा पाटील<br>प्रतीक्षा पुंडलिक दुंडगे | 242-244 |
| 62. | अर्थशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचे आर्थिक परिणाम | अश्विनी विपुल पाटील<br>शुभांगी वसंत ठोंबरे | 245-248 |
| 63. | राज्यशास्त्र | महिलांचे राजकारण विशेष संदर्भ कराड महानगरपालिका | तृप्ती रमेश मोरे | 249-252 |
| 64. | राज्यशास्त्र | भारतीय राजकारणाचे आघाड्यांच्या राज्यकारणाकडून बहुमताकडे वाटचाल- स्थिती आणि वास्तव | प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील | 253-257 |

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / VOL. XII / Issue- II ISSN 2277-8063

# १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाचे भारतातील निवडक राष्ट्रीय राजकीय पक्षांच्या धोरणावरील परिणाम

**श्री. राजेंद्र शरद जायकर** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**डॉ. टी. एम. पाटील** उपप्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, सदाशिवराव मंडलीक महाविद्यालय, मुरगुड

**गोषवारा**

पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांच्या नेतृत्वात १९९१ साली तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतात मुक्त अर्थव्यवस्थेची पाया भरणी केली. २१ जुन १९९१ रोजी पी.व्ही.नरसिंहराव यांनी पंतप्रधान पदाचा पदभार साभाळला तेव्हा देश डिफॉल्टरच्या उभरटयावर होता. परकीय चलनाचा साठा निच्चांकी पातळीवर होता. केवळ १५ दिवसांची आयात करणे शक्य होईल एवढेच परकीय चलन शिल्लक होते. महागाई दर १३टक्के झाला होता. तो १७ टक्क्यांन पर्यंत जाण्याची शक्यता होती. उद्योगधंदे ठप्प झाले होते. अशा परिस्थितीत मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करून भारताला या आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचे काम तत्कालिन सरकारने केले.

नंतरच्या कालखंडात भारतातील विविध राजकीय पक्षांनी राबवलेल्या आर्थिक धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत लक्षणीय बदल झाले. १९८९ ते २०१४ हा कालखंड आघाडींच्या सरकारचा राहिला. यात प्रामुख्याने कॉग्रेस प्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडी (UPA)आणि भारतीय जनता पक्ष प्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA)यांचे प्राबल्य राहिले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कॉग्रेस आणि भाजप या दोन पक्षांचा प्रभाव राहिला. सदर शोध निबंधात या दोन राष्ट्रीय राजकीय पक्षांच्या धोरणावर १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्विकारानंतर झालेल्या परिणांमाचा आढावा घेण्यात आला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर राजकीय विचांराचे आणि त्यांच्या आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच सदर पक्षांचे निवडणूक जाहीरनामे व वेळोवेळी घेतलेल्या भुमिका, स्विकारलेली धोरणे व या सर्वांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव यांचा आढावा सदर शोध निबंधात घेण्यात आला आहे.

**पारिभाषिक शब्द (keywords)**

मुक्त अर्थव्यवस्था , आघाडी सरकारे, एनडीए, युपीए, राष्ट्रीय राजकीय पक्ष.

**प्रस्तावना**

१७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील राजकीय प्रवासाची सुरवात झाली. १८५८ पासुन ब्रिटीश शासनाची प्रत्यक्ष राजवट भारतात सुरू झाली. या काळात भारतीय अर्थव्यवस्था ग्रामीण समाज केंद्रीत व राष्ट्रीय दृष्टया विकेंद्रीत स्वरूपाची आणि वस्तू व सेवा विनिमयावर अधारित होती. ब्रिटीश राजवटीच्या कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थेत अमुलाग्र बदल झाले. यामध्ये प्रामुख्याने १) मुद्राविनिमयाचा प्रसार वाढला. २) कृषीक्षेत्रात नगदी पिकांच्या उत्पादनात वाढझाली. सुत, नीळ, ऊस, तंबाखू व तेलबिया यांच्या उत्पादनास प्राधान्य दिले जाऊ लागले. ३)राजकीय एकीकरणासोबत अर्थव्यवस्थेचे एकीकरण होऊन राष्ट्रीय बाजार पेठेच्या निर्मितीस चालणा मिळाली. ४) केंद्रीकृत प्रशासकीय व्यवस्थेची निर्मिती झाली. ५) एकीकृत चलन व्यवस्थेची निर्मितीस चालणा मिळाली.

यासोबत भारतीय खाजगी उद्योगधंदयात वाढ होवून भाडवलदार वर्गाची निर्मिती होऊ लागली. स्वातंत्र्य आंदोलनात सुरू झालेली स्वदेशीची चळवळ, पहिल्या व दुसऱ्या महायुध्दामुळे युरोपातील अर्थव्यवस्था कोलमडल्याने भारतीय उद्योगांच्या विकासाला पोषक वातावरण लाभले. ब्रिटीश राजवटीचे भारतीय अर्थव्यवस्थेला असे काही लाभ झाले. तसेच

ब्रिटीशांच्या स्वार्थी अर्थनीती मुळे भारतात वांरवार पडणारे दुष्काळ, करांचा बोजा यामुळे शेतीवर अवलंबुन असणारा ७२ टक्के भारतीय समाज अत्याधिक गरीबी, बेरोजगारी, निरक्षरता, लोकसंख्येचा विस्फोट, असतुंलित भोजनमान अशा भयानक समस्यांनी ग्रस्त झाली होती.

स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक नियोजनाची प्रक्रिया १९५१ साली पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू झाली. तत्पुर्वी १९३४ मध्ये एम.विश्वेशवरैया यांनी Planned Economy For Indiaया पुस्तकात भारताच्या आर्थिक नियोजनाची रूपरेषा मांडली. पुढे १९३८ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. जिच्या माध्यामातुन भारताच्या आर्थिक नियोजनाचा मसूदा तयार करण्यात आला. यासोबत स्वतंत्र भारतासाठी विविध विचारसरणीच्या विकास योजना बनविल्या गेल्या. ज्यात प्रामुख्याने महात्मा गांधी यांच्या विचारतुन ग्रामिण समाज केंद्रीत, लघू उद्योगाना प्राधान्य देणारी व राज्याची भुमिका मर्यादित ठेवणारी विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करणारी अशी होती. तर इतर सर्व योजना राज्यकेंद्रीत होत्या यात प्रामुख्याने बॉम्बे प्लान खाजगीकरण व्यापार स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. तर पिपल्स प्लान खाजगीकरणावर अंकुश ठेवून समाजवादी भुमिका मांडताना दिसतो.[१]

स्वतंत्र भारताचे नेतृत्व करणाऱ्या कॉंग्रेसपक्ष आणि पंडित नेहरू यांच्यावर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. भारतातील गरीबी व मागासलेपणा दूर करण्यासाठी समाजवादी विचारसरणी योग्य असल्याची भुमिका नेहरूंची होती. तर दुसऱ्या महायुध्दानंतर युरोप व अमेरिकेत भांडवलशाहीचा मोठयाप्रमाणावर विकास झाला होता. या सर्व अनुभवातून मिश्र अर्थव्यवस्थेच्या आधारे भारताचा सामाजिक व आर्थिक विकास साधन्याचे लक्ष निश्चीत करण्यात आले. ज्यात खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांना योग्य स्थान व संधी देण्यात आली. १९९० च्या दशकात ६ व्या ७ व्या पंचवार्षिक योजनामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणात सुधारणा झाल्या. पुढे १९९० मध्ये सोव्हीयेत रशियाचे विघटन, चीन–व्हिएतनाम सारख्या राष्ट्रांच्या धोरणातील बदल आणि भारतावर आलेल्या आर्थिक संकटाचा सामना करण्याच्या दृष्टीकोणातून १९९१ साली मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. ज्यामुळे पुढिल काळात भारतीय समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण यामध्ये अमुलाग्र बदल झाले. राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर अनेक राजकीय पक्षांच्या ध्येय धोरणामध्ये बदल झाले यापैकी राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष आणि भारतीय जनता पक्ष यांच्या धोरणावर १९९१ च्या आर्थिक सुधारणांचा झालेला परिणाम सदर शोध निबंधात अभ्यासला आहे.

**उद्दिष्टये**

१) राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या ध्येय धोरणांवर १९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणांचा पढलेला प्रभाव अभ्यासणे

२) भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणांवर १९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणांचा पढलेला प्रभाव अभ्यासणे

**१९९१ पुर्वीचे राष्ट्रीय कॉंग्रस पक्षाचे आर्थिक धोरण**

१८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाली ही भारतीय स्वांतत्र्य चळवळीच्या इतिहासातील अत्यंत महत्वपूर्णघटना होती. भारतीयांच्या आशा अपेक्षा आणि भुमिका ब्रिटीश राजवटीपर्यंत पोहाचवण्यासाठी एक राष्ट्रीय व्यासपीठ देण्याचे कार्य कॉंग्रेसने केले. पुढे हीच राष्ट्रीय कॉंग्रेस सपुर्ण भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या केंद्र स्थानी राहीली. त्यामुळे स्वतंत्र भारताचे नेतृत्व आणि विकासाची जबाबदारी देखील कॉंग्रेसकडे आली. भारतीय जनतेच्या स्वप्नातील सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टया समृध्द भारत घडवण्याच्या दृष्टीने पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी सिध्दांताची कास पकडून मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून आत्मनिर्भरता, जमिन सुधारणा, आर्थिक समानता , हरित क्रांती, मोठी धरणे, उद्योगधंदयांचा विकास साधण्याचं प्रयत्न झाले. कॉंग्रेस

पक्षाच्या या मिश्र अर्थव्यवस्थावादी नितीचा प्रभाव सुरूवातीच्या काही पंचवार्षिक योजनांमधून आढळून आला तसेच हरीतक्रांती व श्वेतक्रांतीसाठी पायाभरणी करण्याचे काम केले.

१९५६ च्या औद्योगिक निती कायदयाच्या माध्यमातून अवजड उद्योगांवर नियंत्रण ठेवण्याचे सरकाचे नियोजन राहीले. लघू उद्योगांसाठी स्थापन केलेल्या कर्वे समितीच्या माध्यामातून लघू उद्योगांची स्पष्ट व्याख्या करण्यात आली व त्यांच्या शिफारशीच्या आधारे लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भारतात लोह पोलाद व कोळश्याचे विक्रमी उत्पादन झाले. इंदीरा गांधींच्या नेतृत्वात समाजवादी विचारांचा प्रभाव वाढला बॅकांचे राष्ट्रीयीकरण, तनखेबंदी, जमिन सूधारणा अशा निर्णयामधून हे दिसून येते. १९६७ ते १९७५ हा काळ खाजगी क्षेत्रावरील वाढते नियंत्रण आणि राष्ट्रीयीकरणाच्या प्रभावाचा राहिला.२इंदिरा गांधीनी उदारीकरणाविरोधी भूमिका घेवून खाजगी उद्योगांसाठी नवीन परवाना पध्दती आणि इतर निर्बंधांसह सार्वजनिक क्षेत्राचा आक्रमकपणे विस्तार केला. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाची सुरूवात पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९९० च्या दशकात केली.३

१९५० ते १९८० च्या दरम्यान उद्योगांचे राष्ट्रीयीकरण झाले खाजगी उद्योगांसाठी परवानाराज व जाचक नियम व अटीमुळे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. राजीव गांधी यांनी हे परवाना राज कमी करून सॉफ्टवेअर आणि दुरसंचार उद्योगांच्या वाढीला चालना देवून उदारीकरणाचा पाया घातला. पुढे नरसिंहराव सरकारने १९९१ साली परवानाराज प्रणाली रद्द करून उदारीकरण प्रक्रीया सुरू केली ज्यामुळे सरकारी मक्तेदारी संपवली.भाडवली बाजारात सुधारणा झाल्या परकीय गुतवणुंकदारांना निमंत्रण देण्यात आले, वित्तिय तुट कमी करणे, सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करणे आणि पायाभुत सुविधामध्ये गुंतवणुक वाढवणे हे ध्येय निश्चित करण्यात आले. औद्योगिक परवाण्यांमध्ये कपात करण्यात आली अशा प्रकारे आर्थिक अपरिहार्यतेतून स्विकाराव्या लागलेल्या सुधारणांचा प्रभाव १९९१ नंतरच्या कॉंग्रेसच्या ध्येय धोरणांवर होत राहिला.४

## १९९१ नंतरचे राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे आर्थिक धोरण

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारातून निर्माण झालेल्या मिश्र अर्थव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या सत्ता काळातच एवढया मोठया आर्थिक सुधारणा स्विकाराव्या लागल्याने त्यांचे समर्थन करणे आणि फायदे जनतेपर्यंत पोहोवण्याची जबाबदारी कॉंग्रेस पक्षावरच येवून पडली १९९६ च्या पक्षाच्या निवडणूक जाहिरनाम्यात आर्थिक सुधारणांचे फायदे नमुद करण्यात आले परंतु त्यावेळी जनमत या आर्थिक सुधारणांच्या बाजुने राहिले नाही परीणामी या आर्थिक सुधारणांचा मोठा राजकीय फटका राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाला बसला व १९९६ च्या सार्वत्रिक निवडणुकित इतिहासातील सर्वात निच्चांकी जागांसह पराभव करावा लागला.

आजचे कॉंग्रेसचे आर्थिक तत्वज्ञान खुल्या आणि उदारमतवादी बाजाराच्या अर्थव्यवस्थेच्या कल्पणेवर आधारलेले आहे. १९९६ ते २००४ दरम्यान च्या काळात राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष सत्ते बाहेर राहीला. ही पहिलीच वेळ होती की इतका प्रदिर्घकाळ कॉंग्रेस सत्ते बाहेर राहीली. २००४ च्या निवडणूक जाहिरनाम्यात कॉंग्रेसने अर्थव्यवस्था परदेशी गुंणतवणूकीसाठी खुली करण्याचे आणि उद्योगांतील राज्याचे नियंत्रण कमी करण्याची भुमिका घेतली असली तरी सामाजिक कल्याण कार्यक्रम आणि गरीबी व असमानता कमी करण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची वचनबध्दता कायम ठेवली आहे.५

२००४ च्या निवडणुकीत कॉंग्रेस प्रणीत युपीए आघाडीला सत्ता प्राप्त झाली. १९९१ च्या आर्थिक सुधारणांचे प्रनेते डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्व खाली सरकार स्थापन करण्यात आले. २००४ ते २०१४ या १० वर्षांच्या काळात कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने भारतीय अर्थव्यवस्था वाढीच्या दृष्टीकोणातून मार्गक्रमण केले. २००३ मध्ये ६१७.७ बिलियण डॉलर असणारी भारतीय अर्थव्यवस्था २०१३ मध्ये १८४१.७ बिलियण डॉलर्स पर्यंत पोहोचली.६ युपीए च्या पाहिल्या कार्यकाळामध्ये आर्थिक

विकासांचा वेग व पक्षाची लोकप्रियता चांगली राहीली. बहूतेक सर्व आघाडयांवर सरकारची कामगीरी योग्य झाली. मात्र दुसऱ्या कार्यकाळात २जी घोटाळा, कोलगेट घोटाळा, चारा घोटाळा अशा भ्रष्टाचारांच्या आरोपांमुळे कॉंग्रेस पक्षाच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला व कॉंग्रेस पक्षाला इतिहासातील सर्वात मोठा पराभव पत्करावा लागला. २०१४ व २०१९ च्या जाहिरनाम्यात अर्थव्यवस्था अधिकाधिक मुक्त आणि स्पर्धात्मक बनवणे, परकीय गुंतवणूकीला अनुकुल वातावरण निर्माण करणे, जी एस टी ची अंमलबजावणी अशा गोष्टींचा समावेश करण्यात आला. परंतु या आश्वासणांना जनतेचा प्रतिसाद लाभला नाही.

**१९९१ पुर्वीचीभारतीय जनता पक्षाचे आर्थिक धोरण**

१९९० च्या दशकापासूनच्या भारतीय राजकारणातील प्रमुख राष्ट्रीय राजकीय पक्षांपैकी भारतीय जनता पक्षाचे स्थान महत्वपुर्णठरते. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीत १९८९ पासुन चालत आलेल्या आघाडीच्या सरकरांची परपंरा मोडित काढत पुर्णबहूमताने सत्तेवर येणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष होय. १९५१ साली शामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या अखिल भारतीय जनसंघ या पक्षाची आर्थिक विचारसरणी हि सुरवातीपासून स्वदेशी व राष्ट्रवादी अर्थनीतीचा पुरस्कार करणारी राहीलेली आहे.[७] पुढे आणीबाणी (१९७५ – ७७) दरम्यान इतर अनेक कॉंग्रेस विरोधी पक्षांसोबत जनसंघ जनता पक्षामध्ये विलीण झाला. १९७७ च्या निवडणुकीत सत्ता प्राप्ती नंतरही पुढील ३ वर्षात जनता पक्षाचे अंतर्गत संघर्षातुन विघटण होवून १९८० साली भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात निवडणुक लढवलेलया या पक्षाला १९८४ साली लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत केवळ २ जागा मिळाल्या. १९८४ च्या निवडणुक जाहिरनाम्यात सार्वजनिक क्षेत्राला उत्पादक व फायदेशीर बनवने, बहूराष्ट्रीय कॉरपोरेट क्षेत्रातील कंपन्यांच्या मर्यादा निश्चित करणे, स्वदेशी उद्योगधंदयाना चालना देणे, उद्योजकांनी सार्वजनिक हिताचे विश्वस्थ म्हणून कार्य करणे, सार्वजनिक उद्योगांना उत्कृष्ट स्तरावर पोहोचवून सन्मान प्राप्त करून देणे. अशा गोष्टींचा समावेश होता.[८]

१९८९ च्या निवडणुक जाहिरनाम्यात खाजगी कंपन्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना कपंनीचे भागधारक बनवने व नफयाचा वाटा मिळवून देणे, सार्वजनिक क्षेत्रासाठी राष्ट्रीय व्यवस्थापन सेवा सुरू करणे, राष्ट्रीय वस्त्रोद्योग धोरण निर्माण करून या उद्योगाला सरकारी संरक्षण देणे अशा पध्दतीची स्वदेशी व राष्ट्रवादी अर्थनीतीची भुमिका पक्षाने घेतली व भाजप हा ८५ जागांसह लोकसभेतील ३ रा सर्वात मोठा पक्ष ठरला.[९] पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या १९९१ च्या आर्थिक सुधारणानंतर भारतीय जनता पक्षाच्या आर्थिक धोरणामध्ये अमुलाग्र बदल झाले. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणाला काही अंशी पाठींबा देणारा विचार प्रवाह पक्षात निर्माण होऊ लागला व त्यामुळे पुढील कालखंडात भारतीय जनता पक्षाचे आर्थिक धोरण बदलत गेले.

**१९९१ नंतरचे भारतीय जनता पक्षाचे आर्थिक धोरण**

१९९२ साली भाजपच्या सर्वोच्च व्यासपीठावर या आर्थिक सुधारणांबाबत तीव्र मतभेद झाले. व्यापक चर्चेनंतर पक्षाने मे १९९२ मध्येHumanistic Approach to Economic Development – A Swadeshi Alternativeअशा शिर्षकाखाली ५४ पानी आर्थिक धोरणाचा स्विकार केला. ज्या व्दारे सार्वजनिक क्षेत्राचे रक्षण, परकीय थेट गुंतवणुकीवर नियंत्रण, कायदेशीर कामगार संघटनांच्या हक्काचे संरक्षण,R.B.Iसाठी वित्तीय शिस्त व स्वायत्ततेची हमी अशा बाबींचा समावेश होता.[१०]

१९९७ नंतर अटल बिहारी वाजपेय यांच्या नेतृत्वा खाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सत्ता काळात भाजपतील उदारीकरणवादी विचारांचे नेतृत्व आणि स्वदेशी केंद्रीत भुमिका असणारेयांच्यात संघर्ष राहिला. १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या कॉंग्रेस सरकारच्या निर्णयापासून भाजप मध्ये आर्थिक विचारांचासंघर्ष सुरू झाला. १३ मार्च १९९२ रोजी सुरू झालेल्या सारणाथ येथील राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीचा आर्थिक धोरण हा मुख्य विषय

होता. या बैठकीत कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी त्यांच्या सहयोगी संघटनांशी सल्लामसलत करण्याचा निर्णय झाला.

उदारीकरणानंतरच्या काळातही सुरूवातीस भाजपची स्वदेशी मोहिम प्रभाविपणे चालवली गेली. १९९६ च्या भाजपच्या निवडणूक जाहिरणाम्यात या गोष्टींचा स्पष्ट उल्लेख केला आहे. लघू उद्योगांच्या वाढीवर लक्ष केंद्रीत केले आहे.[११]

वाजपेयींच्या नेतृत्वाखाली भाजपची स्वदेशी मोहीम हळूहळू मवाळ झाली. भाजपच्या १९९९ च्या निवडणूक जाहीरनाम्यात असे नमुद करण्यात आले की पक्ष परकीय गुतवणूकीचे स्वागत करतो. राजकीय परीस्थितीमुळे पक्षाच्या आर्थिक विचारसरणीत उत्क्रांती झाली. सत्तेवर आल्यानंतर वाजपेयींनी विमा, माध्यमे सारखी काही क्षेत्रे परकीय गुंतवणूकीस खुली केली.[१२]

२००४ नंतर विरोधी पक्षात असताना भाजपने तत्कालीन कॉंग्रेस सरकारच्या अनेक धोरणांवर टिका केली. आर्थिक उदारीकरणाचा निषेध केला कॉंग्रेसकडून प्रस्तावित रिटेल क्षेत्रातील परकीय गुंतवणूकीस अक्षेप घेतला.

नरेंद्र मोदींकडे भाजपचे नेतृत्व आल्यापासून पक्ष आणि सरकार या दोन्हीवर त्यांचे नियंत्रण राहिल्यचे दिसते. त्यांना हव्या त्या प्रकारची आर्थिक धोरणे राबवण्याची मोकळीक त्यांना असल्यामुळेच नोटबंदी, GSTची अंमलबलावणी, खाजगीकरण, परकीय गुणतवणूकीसाठीचे प्रयत्न अशा गोष्टी घडताना दिसतात. हा मोठा बदल भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणांमध्ये झालेला दिसतो.

२०१३ साली उद्योग अनुकुल भुमिका असणाऱ्या नरेंद्र मोदींना पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून घोषित केल्यानंतर २०१४ च्या जाहिरणाम्यात खाजगी क्षेत्रासाठीची बंधने दूर करण्याचे आश्वसन देण्यात आले. ज्यामुळे भारतीय कंपण्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करणे सोपे होईल. आज मोदी सरकारने अनेक सरकारी क्षेत्रांमध्ये FDIची मर्यादा वाढवली आहे. परदेशी गुंतवणूक दारांवरील नियमाकभार कमी केले आहेत. अनेक भाजपाशसित घटक राज्यांमध्ये कठोर कामगार कायदयांमध्ये सुधारणांसह व्यावस्था अनुकुल नियम स्विकारले आहेत.

२०१६ च्या ऑगस्ट महिन्यात भाजप सरकारणे नोटबंदीचा निर्णय अचानकपणे जाहिर केला. चलनातील जवळपास ८६ टक्के (मुल्यानुसार ) नोटा बंद करण्यात आल्या. काळा पैसा बाहेर काढणे, बनावट चलनास आळा घालणे, व्यवहारातील रोखीच्या व्यापारावर नियंत्रण करणे. अशा उद्दीष्टासाठी घेतलेल्या या निर्णयात फारसे यश आल्याचे दिसत नाही.

याच काळात GSTची अमलबजावणी करण्यात आली.GSTने अनेक अप्रत्यक्ष करांच्या श्रेणीला एकसंघ मुल्यावर्धित करात एकत्र केले. मेक इन इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे व परदेशी गुंतवणूक आकर्षीक करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

अशा प्रकारे भारतीय जनता पक्षाच्या आर्थिक ध्येय धोरणांमध्ये १९९१नंतरकाळाणूरूप बदल होत गेले. त्यांचा स्वदेशीचा अजेंडा आज काही अंशी मागे पडला आहे. १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्विकारानंतर पक्षाने देखिल एन डी ए आघाडी सरकारच्या काळात सहकारी पक्षांच्या संबंधातील अपरीहार्यतने स्विकारलेल्या भुमिका आज अधिकृतपणे आणि पुर्ण बहूमतासह सत्तेत आल्यावरही भाजपने स्विकारलेली दिसते.

**निष्कर्ष**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात १९९१ च्या आर्थिक सुधारणा या भारतातील राजकीय पक्षाच्या विचारधारांमध्ये अमुलाग्र बदल घडवणाऱ्या ठरल्या.प्रमुख पक्षाच्या राजकीय स्पर्धा आर्थिक सुधारणांसाठी पोषक ठरतात. १९८९ ते २०१४ या काळातील आघाडी सरकारांमधील उल्लेखनिय बाब म्हणजे राजकीय सत्तेच्या अनियंत्रित वापर

करण्याची गैरसोय सत्तेतील प्रमुख राजकीय पक्षांची झाली. राजकीय पक्षांचे अस्तित्व धोक्यात येते तेव्हा त्यांना आर्थिक कामगिरी सुधारणारी धोरणे राबवणे सक्तीचे होते.

२१व्या शतकाच्या सुरवातीस 'भावनिक, सामाजिक कार्यक्रमांव्यतिरिक्त आर्थिक सुधारणांचे आश्वासन देण्याची स्पर्धा प्रमुख राजकीय पक्षांच्या नेतृत्वात सुरू झाल्याचे दिसते.भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यातील राममंदिर, कलम ३७०, समान नागरी कायदा या गोष्टी काही काळ बाजूला ठेवून रोजगार रोजगार, भ्रष्टाचार, आर्थिक सुधारणा, महागाई या मुद्याच्या आधारे १९९९ ते २०१४ पर्यंतच्या निवडणुका लढवल्याचे दिसते.

१९९१ नंतर राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने समाजवादाची छबी सोडून जागतीक स्पर्धेच्या काळात आर्थिक ध्येयधोरणांमध्ये मूलगामी बदल केले. जे देशाचे तसेच पक्षाचे अस्तित्व टिकऊन ठेवण्यास आवश्यक होते.

**संदर्भ**

१.Indian Economics Policy,Edited By Dr. Dilfraz SinghUSI Publications, New Delhi,
Lovely Professional University, Phagwara.

२.https://www.britannica.com/place/India/Politics-and-the-economy

३.https://business.mapsofindia.com/india-economy/political.html

४. Election Manifesto of Indian National Congress General Election (Lok Sabha) 1996 https://www.rediff.com/news/1996/cong.htm

५. Election Manifesto of Indian National Congress General Election (Lok Sabha) 2004 https://ia800904.us.archive.org/30/items/CongressManifesto2004/Congress%20Manifesto%202004.pdf

६. Election Manifesto of Indian National Congress General Election (Lok Sabha) 2014 https://cdn.inc.in/manifestos/pdf_documents/000/000/001/original/Manifesto-2014.pdf?1506426027

७. History of Bharatiya Janata Party https://en.wikipedia.org/wiki/Bharatiya_Janata_Party#:~:text=In%20April%201980%2C%20shortly%20after,as%20the%20Bharatiya%20Janata%20Party.

८. Election Manifesto of Bharatiya janata Party General Election (Lok Sabha)1984 https://library.bjp.org/jspui/handle/123456789/237

९. Election Manifesto of Bharatiya janata Party General Election (Lok Sabha)1989 https://library.bjp.org/jspui/handle/123456789/238

१०. BJP's economic model, The Hindu, e-paper,October 22, 2019https://www.thehindu.com/opinion/letters/bjps-economic-model/article29760748.ece

११.Election Manifesto of Bharatiya janata Party General Election (Lok Sabha)1996 https://library.bjp.org/jspui/bitstream/123456789/261/1/BJP%20ELECTION%20MANIFESTO%201996.pdf

१२.https://carnegieendowment.org/2019/04/04/hindu-nationalism-and-bjp-s-economic-record-pub-78720

3.2.1

ISSN 2277-8063 (Print)
June- 2023
Vol. XII / Issue. II / 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot
नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***Indexed by:***

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

***- Published by-***
**HOUSA Publication**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 65. | मराठी | महात्मा गांधीजींच्या आर्थिक तत्त्वज्ञानाची प्रसंगिकता | प्रा. भीमराव जोतिबा शिंदे | 258-262 |
| 66. | English | Identity Crisis in the Era of Globalization: A Study of Kiran Desai's the 'Inheritance of Loss' | Snehal Vijaykumar Tade | 263-266 |
| 67. | English | Effect of Globalization in Chetan Bhagat's Selected Novels | Ms. Swayamprabha S. Sarnagdum | 267-270 |
| 68. | राज्यशास्त्र | मुक्त अर्थव्यवस्थेचे सामाजिक परिणाम आणि मराठा क्रांती मूक मोर्चा | ऋतुराज किशोर माने | 271-273 |
| 69. | राज्यशास्त्र | यशवंतराव मोहिते यांच्या विचारांची मुक्त अर्थव्यवस्थेतील प्रस्तुतता | केतन दत्तू लाटे | 274-277 |
| 70. | राज्यशास्त्र | महात्मा गांधी यांचा विज्ञान तंत्रज्ञान आणि यंत्र विषयक दृष्टिकोन | प्रा ए बी मोहिते | 278-281 |
| 71. | Political Science | The Liberation movement of Hyderabad Karnataka: with Special Reference to Koppal District. | Prof. Bharati H Mannur. Prof. Prakash Kattimani. | 281-288 |
| 72. | राज्यशास्त्र | भारतीय संघराज्य समोरील आव्हाने | भारतभूषण विश्वास महाले | 289-292 |
| 73. | राज्यशास्त्र | लोकप्रशासनातील नवे प्रवाह: तोडून एक लोकप्रशासन व विकास प्रशासन | प्रा. पांडुरंग विष्णू पाटील | 293-296 |
| 74. | राज्यशास्त्र | सत्यशोधक : गुरुवर्य शामराव देसाई | डॉ. दीपक पाटील | 297-299 |
| 75. | Political Science | Governor in Indian Federal System of India | Dr. Anil D. Patil | 300-303 |
| 76. | राज्यशास्त्र | भारतीय लोकशाही आणि निवडणूक सुधारणा | डॉ अरुण दामोदर नलावडे | 304-306 |
| 77. | Political Science | Challenges of Democracy in India in the Recent Decades | Dr. Prabhuraj K Nayaka | 307-309 |
| 78. | हिंदी | वैश्विकरण के परिप्रेक्ष मे बदलते सामाजिक सरोकार | डॉ संजीवनी संदीप पाटील | 310-312 |
| 79. | राज्यशास्त्र | लोकप्रशासनातील नवीन प्रवाह नवलोकप्रशासन | प्रा डॉ टी एम पाटील | 313-315 |
| 80. | राज्यशास्त्र | पक्षांतर बंदी कायदा आणि पक्षीय राजकारण | कु. सुशांत चंद्रकांत पाटील डॉ दिनकर विष्णू पाटील | 316-320 |
| 81. | अर्थशास्त्र | जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम | प्रा कविता विलास पोळ | 321-324 |
| 82. | राज्यशास्त्र | महात्मा ज्योतिराव फुले सार्वजनिक सत्यधर्म व महिला सबलीकरण | प्रा सौ छाया भारत सकटे | 325-327 |
| 83. | राज्यशास्त्र | समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणातील हिंद प्रशांत महासागरातील भू-राजकीय सत्ता संघर्ष आणि भारत | डॉ राजू कमलेश सावंत | 328-330 |
| 84. | English | Relevance of thoughts of 'Satyashodhak Samaj' founded by Mahatma Phule | Sagar Ramu Sawant | 331-333 |
| 85. | राज्यशास्त्र | भारत -आसियान आर्थिक संबंध | प्रा डॉ राक्षसे सिद्धार्थ गुणाजी | 334-340 |
| 86. | मराठी | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे मराठी कादंबरीवर झालेले आर्थिक परिणाम | डॉ प्रशांत बाबाराव सूर्यवंशी | 341-342 |

# लोकप्रशासनातील नवीन प्रवाह नव लोकप्रशासन

**प्रा.डॉ.टी.एम.पाटील,** राज्यशास्त्र विभाग, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड

**प्रस्तावना :**

नवीन लोक प्रशासन ही पारंपारिक सरकारी प्रशासनाविरूद्ध सकारात्मक, तंत्रज्ञानविरोधी आणि श्रेणीबद्ध विरोधी प्रतिक्रिया आहे. जनतेच्या सतत बदलणाऱ्या गरजा आणि संस्था आणि प्रशासन त्या कशा सोडवतात याला प्रतिसाद देणारा हा सिद्धांत आहे. सरकारच्या भूमिकेवर आणि सार्वजनिक धोरणासह सार्वजनिक हिताचा भाग असलेल्या, परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या नागरिकांना सेवा कशा प्रदान करू शकतात यावर लक्ष केंद्रित करणारा हा नव लोकप्रशासन आहे.

**उद्देश :**

1.नवीन लोक प्रशासनाच्या उद्याची पार्श्वभूमी अभ्यासणे

2.नवीन लोकप्रशानाची तत्वे अभ्यासणे

3.नवीन लोक प्रशासनाची वैशिष्टे अभ्यासणे

**नवीन लोक प्रशासनाचा इतिहास**

यूएसए मध्ये 1960 चे दशक असामान्य सामाजिक आणि राजकीय अशांतता आणि उलथापालथीचा काळ होता. या संदर्भात, वाल्डोने असा निष्कर्ष काढला की सार्वजनिक प्रशासनाचा अभ्यास किंवा सराव यापैकी कोणत्याही परिस्थितीत वाढत्या उलथापालथी आणि गुंतागुंतांना अनुकूल प्रतिसाद देत नाही. यासाठी वाल्डोच्या युक्तिवादाचा एक भाग म्हणजे सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित सामान्य अविश्वास, भ्रष्टाचार आणि इतरांच्या संकुचित हितसंबंधांनी ग्रासलेल्या सरकार आणि नोकरशाहीवर जनतेचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी सेवा क्षेत्राच्या नैतिक जबाबदाऱ्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे आवाहन आवश्यक होते. त्यानंतर, अधिक नैतिक सार्वजनिक सेवेकडे वाटचाल करण्यासाठी सार्वजनिक सेवा-आणि कोणत्याही क्षेत्रातील सार्वजनिक सेवकांना आधार देणाऱ्या मूलभूत मूल्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. परिणामीनवीन लोकप्रशासन 1968 मध्ये ड्वाइट वाल्डोच्या संरक्षणाखाली झालेल्या पहिल्या मिनोब्रूक कॉन्फरन्समध्ये त्याचे मूळ असलेले दिसते. या परिषदेने सार्वजनिक प्रशासन आणि व्यवस्थापन क्षेत्रातील शीर्ष विद्वानांना या क्षेत्रावर आणि त्याच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी आणि विचार करण्यासाठी एकत्र आणले. या चर्चामध्ये प्रशासनाचे बदलते स्वरूप कसे आसवे यावर विचार विनिमय झाला.

नवलोकप्रशासने सार्वजनिक सेवकांना उदयोन्मुख संघर्ष आणि तणाव सोडवण्यासाठी पर्यायी मॉडेल ऑफर केले नाही. नागरिकत्व, लोकशाही किंवा सार्वजनिक हित या संकल्पना कालांतराने विकसित झाल्या आहेत आणि विकसित होत आहेत. परिणामी, शासनाची भूमिका आणि सार्वजनिक सेवेची भूमिका वेगवेगळ्या दृष्टीकोनातून क्लासिक मॉडेलच्या मर्यादांच्या पलीकडे ढकलून, इतिहासाला आव्हान देणारी, स्पष्टीकरण देणारी आणि पुरेशी सखोलता असलेला इतिहास रचू शकणाऱ्या मार्गांनी बदलली जात आहे. पारंपारिक अर्थाने केवळ इतिहासच नाही तर सतत सुधारणा घडवून आणणारी परस्परसंवादी टाइमलाइन म्हणून काम करते. त्याच्या केंद्रस्थानी, सार्वजनिक सेवेसाठी संकुचित स्वार्थाच्या पलीकडे जाणारी दृष्टी आवश्यक आहे. वाल्डो सार्वजनिक प्रशासन आणि नोकरशाहीला सभ्यता आणि आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक मानतात: सभ्यतेचा विकास स्वतः सार्वजनिक प्रशासनावर अवलंबून असतो आणि संबंधित संकल्पना विशिष्ट सभ्यता आणि संस्कृतीतील घटक घटक असतात.

**नव लोकप्रशासन :**

नवलोक प्रशासन म्हणजे 'कोणत्याही प्रचलित प्रशासकीय व्यवस्थेत नवीन तथ्ये आणि नवीन पद्धती प्रभावी करणे. तांत्रिक दृष्टिकोनातून, याचा अर्थ 'प्रशासकीय संस्था, वर्तन, पद्धती आणि कार्यपद्धतींमध्ये आयोजित आणि पद्धतशीर सुधारणा होय.

**नवलोकप्रशासनाचे उद्दिष्टे:**

1. प्रासंगिकता

पारंपारिक सार्वजनिक प्रशासनाची उद्दिष्टे होती; कार्यक्षमता आणि अर्थव्यवस्था तर नवीन सार्वजनिक प्रशासनाचे उद्दिष्ट प्रासंगिकता आहे. म्हणजेच, संबंधित सामाजिक समस्यांबद्दल त्याला खोल चिंता आहे. त्याचा मूळ हेतू आहे-- सार्वजनिक प्रशासनाचे ज्ञान आणि संशोधन हे समाजाच्या गरजेच्या संदर्भात "संबंधित" आणि "संबंधित" असले पाहिजे. आता सार्वजनिक प्रशासन केवळ POSDCORB तंत्रज्ञानाशी निगडीत नाही तर लोक प्रशासनाच्या विद्यार्थ्यांना समाजाच्या

मूलभूत समस्यांमध्ये थेट सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. ड्वाइट वाल्डो यांनी वारंवार जोर दिला आहे की समाजाला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्यापासून सार्वजनिक प्रशासन अलिप्त राहू शकत नाही.

2. मूल्य :

नवीन सार्वजनिक प्रशासन स्पष्टपणे मानक आहे. हे पारंपारिक सार्वजनिक प्रशासनाची मूल्ये लपवून वर्तणूक आणि प्रक्रियात्मक तटस्थता नाकारते. मिनोब्रुक कॉन्फरन्सच्या प्रतिनिधींनी स्पष्टपणे सांगितले की मूल्य तटस्थ सार्वजनिक प्रशासन असणे अशक्य आहे. बुद्धिवंतांच्या पातळीवर, अमेरिकेतील अलीकडील काही लेखांनी सार्वजनिक प्रशासनातील नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. सार्वजनिक प्रशासनाच्या कार्याचा विस्तार होत असल्याने, सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या कार्यात नैतिकतेबद्दल जागरूकता आणणे आवश्यक आहे. नैतिक मूल्यांवर पुन्हा भर दिल्याने अनेक महत्त्वाचे परिणाम समोर आले आहेत ज्यांचा सार्वजनिक प्रशासनाच्या अभ्यासावर थेट आणि लक्षणीय परिणाम झाला आहे. यामुळे उत्तरदायित्व आणि नियंत्रणाच्या भावनेकडे सार्वजनिक प्रशासनातील स्वारस्य पुन्हा जागृत होण्यास मदत झाली आहे.

३.सामाजिक समता

पारंपारिक सार्वजनिक प्रशासन हे यथास्थिती स्वरूपाचे होते तर नवीन सार्वजनिक प्रशासन सामाजिक समतेच्या तत्त्वावर भर देते. महिला, मुले आणि दलित यांसारख्या समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक न्याय देण्यासाठी ते संवेदनशील आहे. नवीन सार्वजनिक प्रशासनाचे उद्दिष्ट विशेषाधिकारप्राप्त वर्गाचा अंत करणे आणि सामाजिक समानतेवर जोर देणे आहे.

4. परिवर्तन :

नवीन सार्वजनिक प्रशासन सामाजिक समानता प्राप्त करण्यासाठी बदलावर भर देते. यामुळे समाजातील स्थिती, शोषण, सामाजिक आणि आर्थिक विषमता संपते आणि शोषणविरहित नवीन समाजाची स्थापना होते. नवीन सार्वजनिक प्रशासन समाजात बदल घडवून आणण्याचे साधन म्हणून काम करते. समाजाचे सध्याचे संकट हे गंभीर सामाजिक संघर्षांचे परिणाम आहे, त्यामुळे ते संघर्ष संपवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. या संघर्षांवर मात करण्यासाठी, सध्याची राजकीय आणि सामाजिक व्यवस्था मोडून काढणे आवश्यक असेल, तर लोकप्रशासनातील तज्ञांनी धैर्याने मागणी केली पाहिजे आणि गरज पडल्यास केवळ सुधारणा किंवा क्रांती सुचवून त्यांचे समाधान करून चालणार नाही. समाजाची अशा प्रकारे पुनर्रचना करा की ती इच्छित उद्दिष्टे प्रभावीपणे राबवू शकेल.

थोडक्यात, नवीन लोकप्रशासन नैतिकता, मूल्ये, नाविन्यपूर्ण बदल आणि सामाजिक समानता यावर भर देते. यानुसार सार्वजनिक प्रशासनाची इमारत ही मूल्यांच्या पायावरच उभारता येते. जेव्हा समाजातील विषमता, संघर्ष, आकांक्षा, संदर्भ आणि चिंता यांचे योग्य प्रकारे निराकरण केले जाईल, त्याच परिस्थितीत सार्वजनिक प्रशासनाची योग्यता स्वीकारली जाईल.

**नवीन लोक प्रशासनाची वैशिष्ट्ये**

1. जेव्हा जगात सामाजिक, राजकीय, आर्थिक, तांत्रिक वातावरण झपाट्याने बदलत आहे, तेव्हा प्रशासकीय संस्थांना देखील स्वतःमध्ये बदल घडवून आणावे लागतील जेणेकरून केवळ संस्था प्रभावीपणे काम करू शकत नाही तर तिच्या कामाची परिणामकारकता आणि प्रासंगिकता देखील वाढू शकेल. मोजले जाणे.

2. प्रशासनात नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग असावा. म्हणजेच धोरणनिर्मिती आणि निर्णयप्रक्रियेत लोकप्रतिनिधी वाढले पाहिजेत.

3. प्रशासनाच्या संघटनात्मक रचनेत बदल झाला पाहिजे. पारंपारिक पदानुक्रमानंतरचे केंद्रीकरण नियंत्रण क्षेत्रासारख्या रचनांमध्ये बदल आणले पाहिजेत आणि त्यांच्या जागी पारंपारिक सहकार्य, विकेंद्रीकरण इत्यादींचा अवलंब करणे अधिक चांगले होईल.

4. पारंपारिक प्रशासनाऐवजी, त्यात व्यावसायिकतेच्या भावनेचा समावेश केला पाहिजे जेणेकरुन केवळ काम योग्यरित्याच नाही तर जलद आणि अधिक प्रभावीपणे देखील होईल. त्यासाठी व्यवस्थापकीय शैली अंगीकारावी लागेल.

5. मानवी स्वभावाचा वरील दृष्टिकोन (जे 'असणे' किंवा 'असणे' यावर जोर देते) संस्थांच्या महत्त्वाचे प्रश्न समोर आणते. विलबर्म म्हणतात की "नवीन सार्वजनिक प्रशासनाचे आवश्यक वैशिष्ट्य म्हणजे ते आहे. हे प्रशासकीय प्रयत्नांच्या प्रक्रिया आणि संरचना आणि त्यांच्या उद्दिष्टे आणि उद्दिष्टांच्या परस्परसंबंधांवर अधिक स्पष्टपणे आणि सत्यतेने प्रतिबिंबित करते. आणि ती ध्येये नैतिक आधारावर अधिक जाणीवपूर्वक आणि विवेकपूर्णपणे निवडतात. किंवा नैतिकता.

6. नवीन लोक प्रशासनाचा असा विश्वास आहे की मानवजातीमध्ये संपूर्ण बनण्याची क्षमता आहे. हे त्या दृष्टिकोनाच्या विरुद्ध आहे जे मानवाला उत्पादनाचे अधिक किंवा कमी गतिहीन किंवा स्थिर घटक मानतात.

**सारांश :**

नवीन लोकप्रशासन संकल्पनेने नवीन क्षेत्रे आणि नवीन कल्पनांना जन्म देऊन लोकप्रशासनाच्या विषयाला आणि अभ्यासाच्या क्षेत्राला व्यापक आधार दिला आहे. अभिनव संकल्पनेतून समाजाशी थेट संबंध प्रस्थापित केला आहे. लोकहित किंवा जनहित हा त्यांचा नवा अजेंडा आहे. नवीन लोक प्रशासनाला अधिक उत्साही सुधारक, सजग धोरणकर्ते, सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधी, राजकीय आंदोलक, आशावादी नेता आणि आज समाजात पसरलेल्या विसंगती संपवण्यासाठी सहज उपलब्ध कार्यकर्त्याप्रमाणे जनहितासाठी काम करण्याची भावना असणारा सद्गुरु प्रशासन आवश्यक आहे. असे प्रशासन नोकरशाहीच्या सापळ्यातून बाहेर पडेल आणि एक कार्यक्षम व्यवस्थापक म्हणून उदयास येईल जिथे ते मानवी समस्यांच्या निराकरणावर भर देऊन सामंजस्य आणि सामाजिक समता यासारखे गुण अंगीकारेल.जरी नवीन सार्वजनिक प्रशासन ही पूर्णपणे अमेरिकन संकल्पना आहे. भारतात नवीन लोकप्रशासनाची मुळे अजून पूर्णपणे रुजलेली नाहीत.

संदर्भसूची :

1.बी.एल. फाड़िया एवं कुलदीप फाड़िया , "लोक प्रशासन के तत्व एवं भारत में लोक प्रशासन", साहित्य भवन प्रकाशन; 2020 वी आवृत्ती (1 जानेवारी 2018)
2.प्रा. श्रीकांत देशपांडे, "लोकप्रकाशन", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
3.डॉ.सुवर्णा घुडे-बेनके, लोकप्रशासन", प्रशांत पब्लिकेशन, २०१८
4.वि.भि.पाटील, "लोकप्रशासन", प्रशांत पब्लिकेशन, २०१९
5.डॉ. व्ही. जी. नांदेडकर, "लोकप्रशासन", के सागर पब्लिकेशन,पुणे

# Overview of Financial Literacy Program Inducted Under National Strategy for Financial Education

**Dr. Udaykumar. R. Shinde**
Head,Department of Commerce,
Sadashivrao Mandlik Mahavidyalaya,Murgud, Kolhapur.

**Abstract :**

Financial sectors are a National priority in the Government of India and the Financial Sector as Regulators (RBI, SEBI, IRDAI, and PFRDA) see that theyare an enabler for inclusive development. The RBI implements various financial literacy programs for people time to time. Now a day it has launched various such programs. The proposed paper intends to overview such programs. At the outset, the need for financial programs inducted by RBI is briefly reviewed. Financial Literacy programs are studied in order to provide baseline comparison measures for existing programs with proposed changes. This paper takes review of implementation and management structures of new programs. This paper also focuses on the changes made by RBI in this regard. In the Indian context, Financial Literacy Programs Inducted by RBI is the process of ensuring access to appropriate financial services, Policy and products needed by vulnerable groups such as weaker sections and low income groups at an affordable cost in a fair and transparent manner by mainstream institutional framework. This papers overviews financial literacy financial knowledge, financial behaviour and financial attitude towards People information in context of new programs launched. The RBI should give to awareness the people for taking financial education and complete educational courses; it will help to improve the level of their financial literacy.

There is a need to increase the size of banking as well as other financial sectors to ensure that the benefits of these developments reach the common masses. In the Programs Growth through financial service will reach to the mass Population.

**Keywords :** Financial Literacy Program, Financial Literacy Education, RBI, Financial Knowledge, Financial Behaviourand Financial Attitude.

## Introduction:

The India is very fast changing rate since the past decade. The growth of GDP in the 2021 trend has transformed from 8.9% per annum.According in the International Monetary Fund (IMF), on a per capita income basis, India ranked 142nd by GDP (nominal) and 125th by GDP (PPP). But GDP maximum contribution comes from a much diversified and advanced manufacturing and service sectors. From a poor and static country of villages, India has graduated into a progressive and dynamic economy.Financial literacy programs inducted by RBI is the process of ensuring access to appropriate financial services, Policy

and products affordable to low income and weaker section peoples cost in transparent manner by mainstream framework. In India, financial literacy programs are lifting families out of debt and fueling new prosperity in only 27% of Indian adults and 24% of women. It meets the minimum level of financial literacy as defined by the reserve Bank of India.

**Review of Literature :**

**Singh** (2012) in their research titled Financial stability reports (FSR) of the Reserve Bank of India (RBI), March and December 2010; A critical review with a long term perspective; These articles consider aspects in the reserve Bank of India RBI first set of reports on financial stability. Second this article correlation between stock price and capital flows. Finally it is suggested that the government should gradually move in the direction of prescription financial products to contain exclusive volatility in the financial market.

**Carrasco & mukhopadhyay** (2014) Reserve Bank of India's policy dilemmas: reconciling policy goals in times of turbulence this paper is critical policy dilemmas facing the Reserve Bank of India (RBI) in its pursuit of inflation stabilization and balanced growth objective.There is no simple policies solution to apply in different state of the market and reviews policy decisions undertaken by RBI.

**Bansal** (2017) in their research Role of reserve Bank of India in Indian economythe reserve bank's development role includes ensuring credit to the productive sector of the economy, creating installations to build financial in first infrastructure and expanding access to affordable financial services. It also plays an active role in encouraging efficient customer service throughout the banking industry as well as extension of banking service to all.

**Objectives :**

This paper has following objectives.

1. To study and understanding the effects of the program inducted by RBI in financial literacy under National Strategy for Financial Education (NSFE).
2. To overview progress and challenges of first NSFEand effects of the program.
3. To make appropriate suggestions and remedies to improve the financial literacy program inducted by RBI.

**The Statement of Problem:**

The proposed paper intends to take review of various programs inducted by RBI about financial literacy and its development. It also aims to evaluate in brief the National Strategy for Financial Education (NSFE) and effective strategy for its implementation. Therefore, the

statement of problem is defined as 'Overview Of Financial Literacy Program Inducted Under National Strategy For Financial Education'.

**Research Methodology:**

The present study is best on secondary data and compiled through generals, newspapers, books, news channels and internet data collected is structured in the following by text.

**Definition of Financial Literacy and Education:**

The Organization for Economic Co-operation & Development (OECD) defines Financial Literacy and Financial Education. Financial Literacy is defined as a combination of financial awareness, knowledge, skills, attitude and behaviour necessary to make sound financial decisions and ultimately achieve individual financial well-being (OECD, 2012). Financial Education, on the other hand is defined as the process by which financial consumers/investors improve their understanding of financial products, concepts and risks and through information, instruction and/or objective advice, develop the skills and confidence to become more aware of financial risks and opportunities, to make informed choices, to know where to go for help and to take other effective actions to improve their financial well-being" (OECD, 2005). As can be seen, the term Financial Education and Financial Literacy are not the same, these are related concepts. People achieve Financial Literacy through the process of Financial Education. The achievement of Financial Literacy empowers the users to make sound financial decisions which result in financial well-being of the individual.

**National Strategy for Financial Education-(NSFE)**

India has a large population of adults. This demographic advantage can be leveraged to ensure that India becomes one of the fastest growing economies, with emphasis on inclusive growth through a vibrant and stable financial system. Since a large number of stakeholders, including the Central and State governments, Financial Sector Regulators, financial institutions, civil society, academia, educational institutions in public and private sector and others are involved in spreading financial literacy, a broad National Strategy for Financial Education (NSFE) is a pre-requisite to ensure that they work in tandem and their work is aligned to the overall Strategy on financial education and not at cross purposes. In recent years, it is increasingly being recognized that Nation-wide financial literacy can be achieved only through a multi-stakeholder approach wherein different stakeholders viz. Government, Financial Sector Regulators, Financial Service providers, civil society, academia (both in public and private sector), etc. have a role to play.

National Strategy for Financial Education is defined as "a nationally

co-ordinated approach to financial education that consists of an adapted framework or programme" (OECD, 2019). The NSFE document intends to support the vision of the Government of India and Financial Sector Regulators by enabling various sections of the population to develop knowledge, skills, attitude and behaviour which are needed to manage their money better and to plan for their future. The document also takes stock of the current work done by various stakeholders and adopts a multi-stakeholder approach to achieve financial well-being of Indians.

Towards this objective, the National Centre for Financial Education (NCFE) has been set up by all the Financial Sector Regulators as a Section (8) company under Companies Act, 2013 to undertake basic financial education and to develop suitable content for increasing financial literacy among the masses in the country.

**Key Stakeholders in the National Strategy :**

The following stakeholders have been identified for implementation of the strategic goals. The list is illustrative and not exhaustive.

i. Various Departments of Government of India:
ii. Financial Sector Regulators: RBI, SEBI, IRDAI and PFRDA
iii. National Centre for Financial Education (NCFE)
iv. Development Financial Institutions: NABARD and SIDBI
v. Industry Associations: IBA, AMFI, FEDAI, BCFI
vi. Securities Market Institutions Infrastructure: Stock Exchanges, Depositories
vii. Payment Institutions: NPCI
viii. Investor Education Institutions: IEPFA, IICA, etc
ix. Financial Service Providers: Banks, Insurance Companies, Mutual Fund Companies, Pension Funds, Stock Exchanges and Depositories, Non-Banking Financial Companies, Fin-tech companies, etc
x. Self-Regulatory Organizations (SROs): FIDC, M-Fin, Sa-Dhan, etc
xi. State Rural Livelihood Mission (SRLM) of all states
xii. NGOs/ Civil Society Organizations
xiii. Research Institutions
xiv. Consumer Associations
xv. Multi-Lateral Institutions (OECD-INFE, G20, etc.): For knowledge sharing on Global Best Practices

Financial Literacy Programs Inducted by Various Stakeholders Under NSFE

**A. NCFE**

NCFE creates financial awareness and empowerment through financial education campaigns across the country for all sections of the population through seminars, workshops, conclaves, trainings, programs,

campaigns, discussion forums by itself or with help of institutions, organizations and provide training in financial education. It creates workbooks, worksheets, literature, pamphlets, booklets, fliers, technical aids. NCFE prepares appropriate financial literature for target-based audience on financial markets and financial digital modes for improving financial literacy so as to improve their knowledge, understanding, skills and competence in finance.

a. Money Smart School Program (MSSP) is an academic year program where schools voluntarily implement financial education as part of school curriculum.
b. NCFE–National Financial Literacy Assessment Test (NFLAT) is a first kind of national level test, conducted by the NCFE, to measure the level of financial literacy among school students.
c. FETP is an initiative for providing unbiased personal financial education training to school teachers to facilitate inclusion of financial education in school curriculum. With the success of NFLAT, there was a requirement to train the school teachers in the areas of financial education so that they in turn can conduct classes and help school students acquire basic financial literacy skills.
d. FACT (Financial Awareness and Consumer Training) is a program by NCFE to provide financial education to young graduates and postgraduates, on topics relevant to them, which will positively impact their financial wellbeing.
e. Financial Education Program for Adults (FEPA) is a new initiative started by NCFE. FEPA is aimed at providing basic financial education to the adult section of under-served areas of India, especially rural India.

**B. RBI**

RBI has prescribed the following content for basic financial education:

